क्र.१/नसाव/महासभा/ ०६ /२०१६-२०१७
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :१० जानेवारी, २०१७

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०६ /२०१६-२०१७

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक १८/०१/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

10.1.2017
प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.१५/१०/२०१६ रोजीच्या व दि.३०/११/२०१६ रोजीच्या विशेष सभा क्र.१ चे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवट्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली कर्नाळ मुख्य रस्त्यावर असलेल्या पद्माळ फाटेच्या पूर्वेस महात्मा बसवेश्वर चौक असे नामकरण करणेस अंतिममान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१८/११/२०१६ चे विषयपत्र.**

५. महानगरपालिका क्षेत्रामध्ये महात्मा फुले, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर व महात्मा बसवेश्वर यांचे पुतळे बसविणेकामी, असलेला विरोध, त्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश ई. बाबी विचारात घेवून, यांबबत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत **उपायुक्त (सार्व.बांधकाम विभाग) यांचे दि.१७/११/२०१६ चे विषयपत्र.**

६. महानगरपालिका विविध विभागामध्ये कार्यरत मानधन/ठेकेदार/रोजंदारी कर्मचारी यांचे केंद्रीय भविष्य निर्वाह निधी योजना लागू करणेबाबत व हे कामकाज पाहणेसाठी तज्ञ व्यक्तीची नियुक्ती करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.०३/१२/२०१६ चे विषयपत्र.**

७. कुटुंब कल्याण केंद्र आणि नागरी आरोग्य सेवा केंद्राकडील परिचारीकांना सुधारीत दराने धुलाई भत्ता व गणवेश भत्ता लागू करणेकामी मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१३/१२/२०१६ चे विषयपत्र.**

८. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

९. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

10.1.2017

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०६/२०१६-१७

महापालिका सभा दिनांक १८/०१/२०१७ करीता.

बुधवार दि.१८/०१/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. मा.सौ.शिंदे आशा नितीन यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली येथील कै.पै.व्यंकाप्पा सिधू सुर्यवंशी (बुरुड) हे जुन्या काळातील प्रसिद्ध पैलवान होते. ते "भारतात दख्खनचा काला पहाड " म्हणून सुपरिचित होते. कुस्ती क्षेत्रात नावाजलेले पैलवान होते. तसेच, ते गवळी गल्ली सरकारी तालीमचे जुने प्रसिद्ध मल्ल होते. त्यांचे नाव सांगली येथील बुरुड गल्ली येथील तांबोळी घर ते कर्नाळ चौकी या रस्त्यास "दख्खनचा काला पहाड कै.पै.व्यंक्काप्पा बुरुड" असे नामकरण व्हावे असे सर्व बुरुड समाज आणि कुस्ती शौकीन यांची इच्छा व मागणी असल्याने, सदर रस्त्यास नामकरण करणेकामी आलेला प्रस्ताव.

२. मा.सौ.खोत संगिता विठ्ठलराव यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली ,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.२५ मधील समतानगर येथे रोड क्र.१ असलेल्या मशिदीच्या उत्तरेस असलेल्या चौकास "मस्जिद ए-अल आक्सा " असे नामकरण करणेबाबतचा व या नामकरणासाठी येणाऱ्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

३. मा.पाटील संतोष शिवदास यांनी दिलेला प्रस्ताव :-

दि.०१ फेब्रुवारी २०१७ पासून एस.टी.महामंडळाकडून सुरु असलेली सिटी बस सेवा बंद करणार असलेची व सदरची बस सेवा महापालिकेने सुरु करावी असे प्रस्ताव आलेबाबत वृत्तपत्रातून बातम्या प्रसिद्ध झालेल्या आहेत.

सद्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता सदरची बस सेवा महापालिकेकडून कार्यान्वीत करणे अशक्य असून, महानगरपालिका सद्या मुलभूत सोयी सुविधा देणेबाबत आर्थिक अडचणीमुळे उदासीन असून, नागरिकांतून मोठ्या प्रमाणात असंतोष आहे. तसेच, महापालिका एरिया हा अत्यंत कमी असून, सांगली मिरज या मार्गावर वडाप मोठ्या प्रमाणात असून, वडापवाले पाहिजे त्या ठिकाणी प्रवाशांना सोडत असलेमुळे प्रवाशांचा कल सिटी बस पेक्षा वडापने प्रवास करणेकडे जादा असून, सिटी बस वेळेवर येत नसलेने व वडाप लागलीच मिळत असलेने प्रवाशी वडापचाच पर्याय निवडतात ही वस्तुस्थिती असलेने, सिटी बस सेवा महापालिकेकडून सुरु करणे अशक्य असलेने, शासनास सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सिटी बस सुरु करणेस असमर्थ असलेबाबतचा प्रस्ताव मा.शासनास पाठविणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणेबाबत आलेला प्रस्ताव.

४. मा.मोहिते शेडजी सुबराव यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये महापालिकेने दैनंदिन कामाचा खोळंबा होवू नये म्हणून विविध पदावर बदली,रोजंदारी व मानधनावर कर्मचारी नियुक्त केलेले आहेत. सदरचे कर्मचारी हे अनेक वर्षे तुटपूंज्या व कमी मानधनावर काम करीत आहेत. त्यांचे काम समाधानकारक असलेने, त्यांना वेळोवेळी मुदतवाढ दिलेली असल्याने, ते आजही तुटपुंज्या मानधनावर महापालिकेची सेवा प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. त्यांना सद्या मिळत असलेले मानधन हे वाढत्या महागाईचा विचारा करता अपुरे होत आहे. सद्या बाजारातील वाढती महागाई विचारात घेता जनजीवन जगणे अशक्य झाले आहे. याचा विचार करता व मा.शासनाकडून अकुशल/अकुशल कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदा नुसार वेतन आदा करणेस प्राप्त होणारे आदेशानुसार त्यांना वेतन आदा करणे आवश्यक आहे.

तसेच, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक- ल दि.२४ फेब्रुवारी २०१५ अन्वये किमान वेतन दर पुनःर्निधारित केलेनुसार किमान मुळ वेतन दर (दरमहा) कुशल कर्मचारी रु.१४०००/- आणि अकुशल कर्मचारी रु.११५००/- आणि महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक - ल दि.२२ फेब्रुवारी २०१६ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्था ((ब) ग्रामपंचायत वगळून) प्रति महिना रु.२६६०/- विशेष भत्ता जाहिर करणेत आला आहे. त्यानुसार बाजारातील वाढती महागाई विचार घेता, महापालिकेकडे विविध विभागाकडे विविध पदावर कार्यरत असलेल्या बदली,मानधन,रोजंदारी व इतर कर्मचाऱ्यांना किमान वेतन आदा करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर महापालिका कामगार संघटना यांनी बदली,मानधन,रोजंदारी व इतर कर्मचाऱ्यांना किमान वेतन आदा करणेबाबत वारंवार केलेल्या मागण्या या सर्व वस्तुस्थितीचा विचार विनिमय करुन धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

५. मा.पवार गौतम संभाजी यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील सांगलीवाडी येथील सि.स.नं.२/१ मधील क्षेत्र ८३१.२० चौ.भाडे तत्त्वावर श्री.संत सेवा वारकरी सांस्कृतिक प्रतिष्ठान सांगलीवाडी यांची २९ वर्षे इमारत व खुली जागा देण्याबाबत वारंवार मागणी होत आहे. वारकरी संप्रदायातील नागरीक सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी वापर करणार असून, सदरची जागा व इमारत त्यांना महानगरपालिका अधिनियमातील ७९ ड नुसार देणे योग्य होणार आहे. त्याचे भाडे मुल्य सहा.संचालक नगररचना विभागाकडून करुन घ्यावे व त्याबाबत नागरीकांकडून हरकती मागवून घेण्यास मान्यता होवून, सदरचा प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

६. मा.पवार गौतम संभाजी यांनी दिलेला प्रस्ताव :-

१) सन २००७० चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३ इमारतीमध्ये आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम

उपरोक्त अधिनियमान्वये सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये (१) हॉटेल (२) रुग्णालय (३) मॉल्स् व किरकोळ व्यावसायीक यांचेकडून या अधिनियमाद्वारे अग्निशमन कर वसुली सुरु असून, मनपाचे कोट्यावधीचे नुकसान सन २००७ पासून सुरु आहे.

२) या अधिनियमान्वये (१) व्यवसायाच्या ठिकाणाच्या मालकांकडूनही हा अग्निशमन कर वसुलात आणणे गरजेचे असताना ही प्रकिया जाणिवपूर्वक न करुन मनपाचे कोट्यावधींचे नुकसान प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी केले आहे. उदा.वसुलात आणला असता तर, १००००x१०००=१,००,००,०००/- वार्षिक आपल्या उत्पन्नामध्ये भर पडली असती पण सन २००७ पासून आतापर्यंत आपले इतक्या रक्कमेचे नुकसान केले आहे. तेव्हा अशा अधिकाऱ्यास निलंबीत करणेकरीता धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

७. मा.ठोकळे जगन्नाथ बापू यांनी दिलेला प्रस्ताव :-

पंतप्रधान घरकुल आवास योजनेतर्गत मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांनी (१)शासन निर्णय क्रमांक प्रआयो,२०१५/प्र.क्र ११०/गृनियो-२ (सेल) दि.०९ डिसेंबर २०१५ (२) शासन शुद्धीपत्रक क्रमांक प्रआयो,२०१५/प्र.क्र ११०/भाग -२/गृनियो-२/सेल दि.१८ फेब्रुवारी २०१६ च्या शासन निर्णयाप्रमाणे "सर्वांसाठी घरे" संकल्पनेवर आधारीत "प्रधानमंत्री आवास योजनेची" अंमलबजावणी (३) मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन शुद्धीपत्रक क्रमांक प्रआयो,२०१५/प्र.क्र ११०/भाग-२/गृनियो-२ दि.०६ आक्टोंबर २०१६ अन्वये सर्वांसाठी घरे ही महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये राबविणेबाबत कळविले होते.

सदर शासन निर्णयानुसार महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील अनेक नागरिकांनी महा-ई-सेवा केंद्रामार्फत ऑनलाईनद्वारे फॉर्म भरण्यास सुरुवात केलेली आहे. तसेच, सदरचे अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर त्यांना रिसीट सुद्धा मिळालेली आहेत.

घर नमुद केलेल्या महत्वाकांक्षी योजनेचा लाभ मिळणेसाठी महानगरपालिका क्षेत्रातील ज्या नागरिकांनी शहरातील वेगवेगळ्या महा-ई-सेवा केंद्रातून अर्ज भरलेले आहेत. त्यांची रिसीट जमा करुन घ्यावीत आणि ज्यांनी अद्याप अर्ज ऑनलाईनद्वारे भरलेले नाहीत. त्यांचे अर्ज ऑनलाईनद्वारे स्विकारण्याची व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करणेत यावी याबाबत धोरणात्मक निर्णय घेवून मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव

८. मा.सौ.खोत संगिता विठ्ठलराव यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १५ मधील वान्लेसवाडी ढेरे मळा या ठिकाणी या ठिकाणी आठवडा बाजार भरणेबाबत नागरिकांची अनेक वर्षापासून मागणी होत आहे. या परिसरातील बेथेलहेमनगर,श्रीरामनगर, रुक्मिणी मार्केट, पाटील मळा या संपूर्ण परिसरामध्ये कोठेही बाजार नसल्यामुळे नागरिकांना मागणीनुसार वान्लेसवाडी ढेरे मळा या ठिकाणी आठवडा बाजार भरविणे अत्यंत आवश्यक आहे.

सदर ठिकाणी महापालिकेचा ओपन स्पेस असल्यामुळे आठवडा बाजारमुळे वाहतुकीस कोणताही अडथळा होणार नाही. या दृष्टीने त्या ठिकाणी आठवडा बाजार भरणेबाबत सदरचा प्रस्ताव खर्चासहीत मान्यता मिळणेकामी धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

९. मा.खोत धनपाल तात्या यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सद्या प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरामुळे मोठ्या प्रमाणात करचरा निर्माण होवू लागला आहे. ही परिस्थिती सर्व देशभर आहे. या प्लॅस्टिकमुळे ड्रेनेज पाईप लाईन्स्, ड्रेनेज चेंबर्स वारंवार चोकअप होवून मलनि:सारण पूर्ण क्षमतेने होत नाही. तसेच, प्लॅस्टिक पासून निर्माण हाणारा कचरा लवकर नष्ट होत नाही. त्यामुळे प्रदुषणही मोठ्या प्रमाणात होत आहे. सद्या ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडी असलेल्या प्लॅस्टिक पिशव्या वापरावर बंदी आहे तरीही अशा पिशव्या बाजारात भाजीपाला व दैनंदिन वापरात असलेचे दिसून येते. या प्लॅस्टिक पिशव्यांचे विघटन होत नसल्यामुळे दररोज हजारो पिशव्यामुळे गटारी चोकअप होवून रस्ते स्वच्छ होत नाहीत.

सद्या पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी व मा.श्री.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचेकडून होत असलेल्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत अशा प्लॅस्टिक पासून निर्माण होणारा कचरा कायमस्वरुपी नष्ट करावयाचा उपाय केल्यास, स्वच्छ भारत अभियांनातर्गत महापालिका ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिक मुक्त हाणास मदत होणार आहे. या प्लॅस्टिक पासून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचा गंभीर प्रश्न महाराष्ट्रातील सर्व महापालिकाना व देशभरात भेडसावत आहे. यापूर्वी म्हणजेच, ज्या काळात प्लॅस्टिकचा वापर केला जात नव्हता, त्या काळात शेतकरी खत विकत घेता. त्यामध्ये प्लॅस्टिकचा वापर दिसून येत नव्हता. सद्या ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिक पिशव्या वापरावर बंदी असली तरीही अशा प्रकारच्या पिशव्या वापरात येत आहेत. त्याकरीता प्लॅस्टिक पिशव्या तयार करणाऱ्या संपूर्ण देशातील कारखान्यावर निर्बंध घालून ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिक पिशव्यांची उत्पादन प्रक्रिया बंद केल्यास ही समस्या कायमस्वरुपी बंद होणार आहे. यासाठी सांगोपांग चर्चा करुन ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या पिशव्या उत्पादनावर पर्यायाने प्लॅस्टिक पिशव्या निर्मितीच्या कारखान्यांवर कायम स्वरुपी निर्बंध घालणेबाबत व उत्पादन थांबविणेस आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत आलेला प्रस्ताव.

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : १६/०१/२०१७.

महापालिका सचिव,
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- 922

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण महासभा दि.१५/१०/२०१६ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.९६ ते ठराव क्र.११७ आणि विशेष सभा दि.३०/११/२०१६ रोजीच्या कार्यवृत्तांतील ठराव क्र.११८ त ठराव क्र.१२१ हे सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

महासभा लिपीक

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १२३

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे मा.महापौरसाहेब यांच्या मातोश्री जुलेखा अजीजभाई शिकलगार यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.संगिता विठ्ठल खोत

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.गौतम संभाजी पवार

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापौर

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १२४

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

तत्कालीन सांगली नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष सुरेश बाळगोंडा पाटील यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी वृद्धापकाळाने दि.०९/०१/२०१७ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.विजय वसंत घाडगे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.शेखर विश्वासराव माने महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १२५

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक जयगोंड परगोंड यांचे दि.३०/११/२०१६ रोजी अल्पशः आजाराने दु:खद निधन झाले. ते सन २००३ ते २००८ मध्ये महापालिकेचे नगरसेवक होते. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.राजेश विठ्ठल नाईक महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १२६

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

माजी नगरसेवक श्री.महेश शिंगारे यांचे यांचे वडील नामदेव ज्ञानदेव शिंगारे यांचे वयाच्या ८० व्या वर्षी शनिवार दि.०७/०१/२०१७ रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.युवराज सतिश बावडेकर ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.स्वरदा श्रीरंग केळकर महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १२८७

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या माजी सभापती सौ.पुष्पलता बाबासाहेब पाटील यांच्या सासू कै.सोनाबाई भिमराव पाटील यांचे दि.१२/०१/२०१७ रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांचे पश्चात मुले,सुना,नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.निर्मला राजेंद्र जगदाळे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.आशा नितिन शिंदे महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १२८

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सदस सौ.सुनिता संजय पाटील यांचे सासरे शहाजीराव बाबासाहेब पाटील यांचे दि.१४ जानेवारी २०१७ रोजी नुकतेच दु:खद निधन झाले त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.संगिता विठ्ठल खोत ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.अश्विनी हेमंत खंडागळे

महापौर,

पदसिध्द अधिकारी

महानगरपालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १२९

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

कवठेपिरान येथील बी.एस.एफ. चे जवान नितीन सुभाष कोळी हे पाकिस्तानने केलेल्या भ्याड हल्ल्यात शहीद झाले त्यांच्या बलिदानाने त्यांच्या कुटूंबियांवरती जो दु:खाचा डोंगर कोसळलेला आहे. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.शिवसज श्रीशैल्य बोळाज

महापौर,

दु:खासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १३०

विषय क्रमांक :- ०२

दु:खवटयाचा ठराव

महानगरपालिकेचे कामगार अधिकारी यांचे बंधू भिमराव मारुती आडके यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक - :- मा.शिवराज श्रीशैल्य बोळाज महापौर, -

प्रशासकीय अधिकारी,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १३१

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

महानगरपालिका क्षेत्रातील जेष्ठ व्यापारी शांतिलाल मगणलाल शहा यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.प्रशांत विजयकुमार पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.संजय घनश्याम बजाज महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १३२

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

कुस्ती परंपरा ही सांगली शहराची ओळख असून, पै.व्यंकप्पा बुरुड,पै.हरीबाबा पवार, पै.जोतीरामदादा पाटील, पै.संभाजी पवार असे अनेक नामवंत पैलवान झाले. अशा पैलवानकी क्षेत्रावर दंगल नावाचा सिनेमा निर्मिती करुन कुस्ती हा खेळ प्रकाराची जगात ओळख निर्माण केल्याबद्दल सिनेमा निर्मात्यांचे सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.गौतम संभाजी पवार महापौर,

प्रशासकीय अधिकारी,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १३३

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

महानगरपालिका क्षेत्रातील सांगलीची सुकन्या स्मृती मानधना यांची जागतिक क्रिकेट टिम मध्ये जगात दुसऱ्या क्रमांकाने निवड झालेबद्दल सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा स्मृती मानधना यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.संजय घनश्याम बजाज

अनुमोदक :- मा.संगिता अभिजीत हारगे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

उपायुक्त/सहा.आयुक्त

महापालिका सांगली मिरज कुपवाड

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १३४

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारण्याच्या कामाचा शुभारंभ केल्याबद्दल व त्याला लागणाऱ्या सर्व परवानग्या तात्काळ दिल्याबद्दल पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी व मा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.वैशाली पांडुरंग कोरे

अनुमोदक :- मा.स्वरदा श्रीरंग केळकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

प्रशासकीय अधिकारी,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- ४३५

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली-सातारा जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थेचे विधान सभा निवडणूकी मधून मा.मोहनराव शेठ कदम हे प्रचंड बहुमताने निवडून आल्याबद्दल सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.शिवराज श्रीशैल्य बोळाज

अनुमोदक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महानगरपालिका सांगली मिरज कुपवाड

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १३६

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

महाराष्ट्र राज्यामध्ये नुकत्याच झालेल्या नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणूकीमध्ये मा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली जनतेतून थेट नगराध्यक्ष निवडी मध्ये भारतीय जनता पार्टीचे ७२ नगराध्यक्ष निवडून आले व राज्यात सर्वाधिक ९०० नगरसेवक भारतीय जनता पार्टीचे झाले. तसेच भारतीय जनता पार्टी महाराष्ट्रातील क्र.१ ची पार्टी म्हणून पुढे आली आहे. या विजयाचे शिल्पकार मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांचे सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.युवराज सतिश बावडेकर ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.स्वरदा श्रीरंग केळकर महापौर.

प्रादेशिक अधिकारी,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १३७

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कर्मचारी यांनी ५००/- व १०००/- रुपयांच्या नोटा रद्द झाल्याच्या काळात नागरिकांच्या कडून त्या कर रुपाने जमा करुन घेणेकरीता जादा काम करुन महापालिकेच्या तिजोरीत १८ कोटी रुपयांची वसुली केल्याबद्दल सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.दिग्विजय प्रदिप सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.शंडजी सुबराव मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी,

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १३९

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

औरंगाबाद येथे दि.६ ते १२ जानेवारी २०१७ दरम्यान २९ वी महाराष्ट्र राज्य पोलिस स्पर्धा घेणेत आल्या. यामध्ये राज्यातील अनेक पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत सांगली जिल्ह्याचे पोलिस प्रमुख श्री.दत्तात्रय शिंदे यांनी पोलिस अधिकारी यांच्या शुटींग स्पर्धेत सहभाग घेवून पिस्तुल शुटींग प्रकारात १४० पैकी १३२ गुण प्राप्त करुन दोन सुवर्ण व एक रौप्य पदक पटकाविले. यावेळी त्यांनी स्वत:चचे यापूर्वीचे रेकॉर्ड मोडीत काढले. त्यांच्या या यशाबद्दल सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.संतोष शिवदास पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.राजू लक्ष्मण गवळी महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक - १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १३९

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे सन्मा.उपमहापौर श्री.विजय वसंत घाडगे व सन्मा.सदस्या सौ.निर्मला राजेंद्र जगदाळे यांच्या वॉर्ड क्र.५ मध्ये मा.आयुक्तसो यांचे सकारात्मक मान्यतेने पहिली क्षेत्रसभा घेणेत आली. या क्षेत्र सभेमध्ये महानगरपालिकेचे श्री.सुनिल पवार उपायुक्त, सांगली श्रीमती स्नेहलता कुंभार सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र.०३ कुपवाड तसेच महापालिकेचे विविध विभागाचे अधिकारी खातेप्रमुख व कर्मचारी यांनी नागरिकांचे विविध प्रश्न,समस्या जाणून घेवून नागरिकांच्या प्रश्नांचे समस्यांचे निरसन केले व पहिली क्षेत्रसभा यशस्वीरित्या पार पाडली.याबद्दल सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे सांगली.मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.शेखर विश्वासराव माने

अनुमोदक :- मा.गौतम संभाजी पवार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी,

महापालिका सभा,

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १४०

विषय क्रमांक :- ०२

निषेध ठराव

सांगली जिल्ह्यातील भिलवडी-माळवाडी येथील अल्पवयीन मुलीवर अत्याचार झालेल्या पिडीत मुलीच्या दुःखद निधनामुळे त्यांच्या कुटुंबियावर ओढविलेल्या दुःखामध्ये ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर तिच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सांगली जिल्ह्यातील भिलवडी-माळवाडी येथील अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन तिचा खून करणेत आला. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या कृत्याचा ही सभा जाहिर निषेध करीत आहे.

सूचक :- मा.संतोष शिवदास पाटील

अनुमोदक :- मा.राजू लक्ष्मण गवळी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव.
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १४१

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१८/११/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली कर्नाळ मुख्य रस्त्यावर असलेल्या पद्माळ फाटेच्या पूर्वेस महात्मा बसवेश्वर चौक असे नामकरण करणेकामी स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिर प्रसिद्धी करुन सूचना/हरकती मागविण्यात आल्या होत्या. विहित मुदतीत एकही सूचना / हरकती प्राप्त न झालेने, सांगली कर्नाळ मुख्य रस्त्यावर असलेल्या पद्माळ फाटेच्या पूर्वेस महात्मा बसवेश्वर चौक असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने प्राप्त झालेली श्री.शिवाजी बाबुराव दुबे यांची उपसूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील अपी बेकरी ते लोकूर हॉस्पिटल या रस्त्यास प्राध्यापक डॉ.जे.जी.डेव्हीड असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास महासभा ठराव क्र.६८ दि.१९/०७/२०१६ अन्वये मान्यता देणेत आलेली होती. त्यानुसार मिरज येथील अपी बेकरी ते लोकूर हॉस्पिटल या रस्त्यास प्राध्यापक डॉ.जे.जी.डेव्हीड असे नामकरण करणेस ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक -

अनुमोदक -

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक,

महापालिका सचिव,

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- ७४२

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (सार्व.बांधकाम विभाग) यांचे दि.१७/११/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये महात्मा फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व महात्मा बसवेश्वर यांचे पुतळे बसविणेकामी, असलेला विरोध, त्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश इ. बाबी विचारात घेवून, यांबबत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. त्यावर सभागृहात विस्तृतपणे चर्चा करणेत आली. चर्चेअंती प्रस्तुत प्रकरणी म्हणजेच, महात्मा फुले यांचा पुतळा सांगली येथील डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांचे पुतळ्या समोर बसविणे, महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा सांगली येथील डॉ.आंबेडकर रोडवरील त्रिकोणी बाग या ठिकाणी बसविणे व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा पुतळा सांगली येथील शिंदे मळा परिसरात होळकर चौकात बसविणेबाबत मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविणेस व मान्यता मिळालेनंतर प्रस्तावित कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

शहर अभियंता,

महापालिका

सांगली मिरज कुपवाड महानगर

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०२/२०१७

ठराव क्रमांक :- १४३

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.०३/१२/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका विविध विभागामध्ये कार्यरत मानधन/ठेकेदार/रोजंदारी कर्मचारी यांचे केंद्रीय भविष्य निर्वाह निधी योजना लागू करणेबाबत व हे कामकाज पाहणेसाठी तज्ञ व्यक्तीची नियुक्ती करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत आलेल्या प्रस्तावावर सभागृहात चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे

मा.आयुक्त, केंद्रीय भविष्य निर्वाह निधी संघटन,दिल्ली यांचे दि.११/०२/२०११ च्या नोटीफिकेशन नुसार व भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२ मधील तरतुदीनुसार महानगरपालिका क्षेत्र कार्यालयामध्ये मानधन/ठेकेदार पद्धतीने /रोजंदारीवर कार्यरत कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी योजना लागू करणेत आलेली आहे. त्यांतर्गत ज्यांचे मासिक वेतन जुले २०१४ पर्यंत रु.६५००/- व ०१ ऑगस्ट २०१४ नंतर रु.१५०००/- पर्यंत आहे अशा कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून १२% प्रमाणे कपात करणे व त्यामध्ये महापालिकेचा हिस्सा म्हणून १२% कपात करुन तो योग्यत्या खात्यावर जमा करणे आवश्यक आहे. तसेच, ऑफिस खर्च १.६१% प्रमाणे मनपा हिस्स्यातून कपात करावी लागणार असलेबाबत सभागृहामध्ये प्रशासनाकडून सांगणेत आले.

उपरोक्त सर्व वस्तुस्थिती विचारात घेता, प्रशासनाने डिसेंबर पेड जानेवारी २०१६ ची भविष्य निर्वाह निधी कपात केलेली असून, त्यानुसार इथून पुढील कपात कायम करणेत यावी असे ही सभा आदेशित करीत असून, सन २०११ पासून ते नोव्हेंबर २०१६ पर्यंतच्या भविष्य निर्वाह निधी कपात करणेबाबतचा प्रस्ताव हा प्रशासनाकडून ज्या-त्या वेळी निर्णयार्थ सादर न झाल्याने व झालेल्या विलंबास प्रशासन पुर्णतः जबाबदार असल्याने, याकामी मा.महापौर,उपमहापौर,आयुक्त,उपायुक्त (सांगली), मुख्य लेखाधिकारी,मुख्य लेखापरिक्षक,आरोग्याधिकारी,आस्थापना अधिकारी यांची समिती गठीत करणेस ही सभा मान्यता देत असून, सदर समितीचा अहवाल लवकरात-लवकर महासभेकडे सादर करणेत यावा. तद्नंतर सन २०११ पासून ते नोव्हेंबर २०१६ पर्यंतच्या भविष्य निर्वाह निधी कपात करणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय घेणेत येईल असे या सभेचे मत आहे.

तसेच, उपरोक्त कामी नियमितता येईपर्यंत महापालिकेचे EPF सल्लागार नियुक्ती करणे आवश्यक असलेचे विषयपत्रामध्ये प्रशासनाने नमुद केले आहे. परंतु, सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार प्रस्तुत कामी सल्लागार यांची नियुक्ती न करता, प्रशासनाने योग्य त्या सक्षम अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने डिसेंबर २०१६ पेड जानेवारी २०१७ पासून यापुढे भविष्य निर्वाह निधी कायम कपात करणेस योग्यती कार्यवाही ठेवावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

प्रशासन अधि.(आस्था.)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१७

ठराव क्रमांक :- १४४

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१३/१२/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेकडील कुटुंब कल्याण केंद्र आणि नागरी आरोग्य सेवा केंद्राकडील परिचारीकांना मा.शासन निर्णय क्र.शुश्रुषा १०९६/प्र.क्र.२०७/सेवा-१, मंत्रालय मंबई दि.१६ नोव्हेंबर २००७ नुसार धुलाई भत्ता रु.६० व गणवेश भत्ता रु.१००/- प्रमाणे सुधारीत दराने धुलाई भत्ता व गणवेश भत्ता लागू करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

प्रशासन अधि. (आस्था),

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ८५ **दिनांक :- २८/०२/२०२७**

ठराव क्रमांक :- ७४५

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये खालील सदस्यांनी दिलेले प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

अ.क्र.	प्रस्ताव देणाऱ्या सदस्यांचे नाव	तपशिल
१.	शिंदे आशा नितीन	सांगली येथील बुरुड गल्ली येथील तांबाळी घर ते कर्नाळ चौकी या रस्त्यास "दख्खनचा काला पहाड कै.पै.व्यंकाप्पा बुरुड" असे नामकरण व्हावे असे सर्व बुरुड समाज आणि कुस्ती शौकीन यांची इच्छा व मागणी असल्याने, सदर रस्त्यास नामकरण करणेकामी आलेला प्रस्ताव.
२.	खोत संगिता विठ्ठलराव	महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.२५ मधील समतानगर येथे रोड क्र.१ असलेल्या मशिदीच्या उत्तरेस असलेल्या चौकास "मस्जिद ए-अल आक्सा" असे नामकरण करणेबाबतचा व या नामकरणासाठी येणाऱ्या खर्चास मंजूरी मिळणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.
३.	पाटील संतोष शिवदास	एस.टी.महामंडळाकडून सुरु असलेली सिटी बस सेवा महापालिकेकडून कार्यान्वीत करणे अशक्य असून, शासनास सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सिटी बस सुरु करणेस असमर्थ असलेबाबतचा प्रस्ताव मा.शासनास पाठविणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणेबाबत आलेला प्रस्ताव.
४.	मोहिते शेडजी सुबराव	महापालिकेकडे विविध विभागाकडे विविध पदावर कार्यरत असलेल्या बदली,मानधन,रोजंदारी व इतर कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यांतर्गत वेतन आदा करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.
५.	पवार गौतम संभाजी	महानगरपालिका क्षेत्रातील सांगलीवाडी येथील सि.स.नं २/१ मधील क्षेत्र ८३१.२० चो.भाडे तत्त्वावर श्री.संत सेवा वारकरी सांस्कृतिक प्रतिष्ठान सांगलीवाडी यांना २९ वर्षे इमारत व खुली जागा महानगरपालिका अधिनियमातील ७९ ड नुसार देणेसाठी भाडे मुल्य सहा.संचालक नगररचना विभागाकडून करुन घेवून व त्याबाबत नागरीकांकडून हरकती मागवून घेण्यास मान्यता मिळणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.
६.	पवार गौतम संभाजी	सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३ इमारतींमध्ये आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियमान्वये महानगरपालिका क्षेत्रामध्ये (१) हॉटेल (२) रुग्णालय (३) मॉल्स व किरकोळ व्यावसायीक यांचेकडून या अधिनियमाद्वारे अग्निशमन कर वसुली सुरु असून, मनपाचे कोट्यावधीचे नुकसान केले असून, अशा अधिकाऱ्यास निलंबीत करणेकरीता धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

७.	ठोकळे जगन्नाथ बापू	पंतप्रधान घरकुल आवास योजनेतर्गत लाभ मिळणेसाठी महानगरपालिका क्षेत्रातील जवा नागरिकांनी शहरातील वेगवेगळ्या महा-ई-सेवा केंद्रातून अर्ज भरलेले आहेत. त्यांची रिसीट जमा करुन घ्यावीत आणि ज्यांनी अद्याप अर्ज ऑनलाईनद्वारे भरलेले नाहीत. त्यांचे अर्ज ऑनलाईनद्वारे स्विकारण्याची व्यवस्था महानगरपालिके मार्फत करणेत यावी, याबाबत धोरणात्मक निर्णय घेवून मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.
८.	खोत संगिता विठ्ठलराव	महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. २५ मधील वान्लेसवाडी ढेरे मळा या ठिकाणी आठवडा बाजार भरणेबाबत सदरचा प्रस्ताव खर्चासहीत मान्यता मिळणेकामी धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.
९.	खोत धनपाल तात्या	महानगरपालिका क्षेत्रामध्ये ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या पिशव्या उत्पादनावर पर्यायाने प्लॅस्टिक पिशव्या निर्मितीच्या कारखान्यांवर कायम स्वरुपी निर्बंध घालणेबाबत व उत्पादन थांबविणेस आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत आलेला प्रस्ताव.

उपरोक्त सर्व प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल व विषयपत्र सादर करणेत यावेत असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक

अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

१) मालमत्ता व्यवस्थापक
२) मुख्य प्रशासकीय अधिकारी,
३) शहर अभियंता
४) कार्यशाळा अभियंता,
५) आरोग्याधिकारी,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका